त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालयाच्या पाडकामाला स्थगिती; पाच जागांची पाहणी

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक – त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालयाची इमारत पाडण्यास तूर्तास स्थगिती देण्यात आली आहे. याबाबत आरोग्य विभागाला आवश्यक सूचना देण्यात आल्या असून, नवीन रुग्णालयासाठी त्र्यंबकेश्वरमधील पाच जागांची पाहणी करण्यात येत आहे. यातील कोणतीही जागा निश्चित करताना नागरिकांना विश्वासात घेतले जाईल, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आरोग्यमंत्री आबिटकर नाशिक दौऱ्यावर असून, शनिवारी त्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्यासाठी सुरू असलेल्या तयारीचा आढावा घेतला. पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी त्र्यंबक उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीच्या पाडकामाबाबत भूमिका स्पष्ट केली. कोणाला त्रास व्हावा, यासाठी सरकार काम करत नाही. रुग्णालयाच्या स्थलांतराबाबत जिल्हाधिकाऱ्यांसोबत चर्चा केली आहे. तूर्तास पाडकामाला स्थगिती दिली असून, त्या ठिकाणी बाह्यरुग्ण विभाग सुरू राहील, असे आबिटकर यांनी सांगितले.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कुंभमेळामंत्र्यांच्या नेतृत्वाखाली कुंभमेळ्याचे नियोजन सुरू आहे. यापूर्वी मंत्रालयातही आरोग्य विभागाची बैठक घेण्यात आली होती. कुंभमेळ्यात मोठ्या प्रमाणात भाविक येणार असल्याने त्यानुसार आरोग्य व्यवस्थेचे नियोजन सुरू आहे. आतापर्यंत करण्यात आलेल्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला. नियोजनातील उणिवा आणि आवश्यक मागण्यांवर चर्चा करण्यात आली. कुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घेतली जाणार आहे.

रुग्णालये, डॉक्टरांची भरती तसेच आपत्कालीन परिस्थितीचा विचार करता शहरातील खासगी रुग्णालये महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत आणता येतील का, याबाबत संबंधितांशी चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

लसीकरणाचे आवाहन

कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक निधीची तरतूद करून आरोग्य सुविधांचे लोकार्पण केले जाणार आहे. त्र्यंबकेश्वर शहरात लवकरच नवीन रुग्णालय उभारण्यात येईल, असे आश्वासन आबिटकर यांनी दिले.

त्र्यंबकेश्वरमध्ये कुंभमेळ्यात तात्पुरती रुग्णालये भाडेतत्त्वावरील जागेत उपलब्ध करून दिली जाणार आहेत. तसेच नाशिक शहरातील आरोग्य व्यवस्थेतील गंभीर बाबी सुधारण्यावर भर दिला जाणार आहे. लवकरच १,७५० रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्या अनुषंगाने नियोजन सुरू आहे. साथीच्या आजारांचा धोका लक्षात घेऊन प्रतिबंधात्मक लसीकरणावर भर देण्यात येणार आहे. भाविकांनी नाशिकला येण्यापूर्वी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात येणार असल्याचे मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

मनपा रुग्णालयास अचानक भेट

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी शनिवारी महापालिकेच्या स्वामी समर्थ रुग्णालयाला अचानक भेट देत रुग्णालयातील सुविधा आणि समस्यांचा आढावा घेतला. त्यांच्या अचानक भेटीमुळे रुग्णालय प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली. यावेळी त्यांनी रुग्ण, नातेवाईक तसेच वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधून दैनंदिन अडचणी जाणून घेतल्या. शिवसेना नगरसेविका किरण दराडे, नगरसेवक नितीन दातीर आणि नगरसेविका प्रियांका दोंदे यांनी आरोग्यमंत्री आबिटकर यांची भेट घेऊन रुग्णालयातील समस्यांकडे त्यांचे लक्ष वेधले. त्यानंतर आबिटकर यांनी तातडीने रुग्णालयाला भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली. प्रभाग क्रमांक २७ मधील नगरसेवकांनी रुग्णालयाच्या वाढत्या गरजा लक्षात घेता सध्याची इमारत पाच मजली करून सर्व अत्याधुनिक सोयी-सुविधांनी सुसज्ज रुग्णालय उभारण्याची मागणी केली. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदनही आरोग्यमंत्र्यांना देण्यात आले.

कुंभमेळ्यात मुख्य पर्वणीत त्र्यंबकेश्वर मंदिर बंद?

आखाडा परिषदेचा विरोध

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक – गोदावरी काठावर २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळा सोहळ्यात मुख्य पर्वणीच्या दिवशी लाखो भाविकांची उसळणारी गर्दी लक्षात घेऊन प्रयागराजच्या धर्तीवर, त्र्यंबकेश्वर मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्याचा प्रशासकीय पातळीवर विचार सुरू आहे. त्यास आखाडा परिषदेने आक्षेप घेत या दिवशी आखाड्यांचे साधू-महंत अमृतस्नानानंतर त्र्यंबकराजाचे दर्शन घेण्याची परंपरा असल्याचे म्हटले आहे. या परंपरेला छेद देण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याची भूमिका प्रमुख महंतांनी मांडली.

त्र्यंबकेश्वरमध्ये अलीकडेच श्रावणी सोमवारी दोन ते तीन लाख भाविकांची दर्शनासाठी गर्दी झाल्यामुळे चेंगराचेंगरीसदृश्य स्थिती निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर, व्हीआयपी दर्शन बंद करून उपाययोजना करण्यात आल्या. कुंभमेळ्यात मुख्य पर्वणीच्या दिवशी सुमारे ७५ लाख भाविक त्र्यंबक नगरीत दाखल होण्याचा अंदाज आहे. प्रचंड गर्दीत कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण मुख्य पर्वणीच्या काळात त्र्यंबकेश्वर मंदिर दर्शनासाठी बंद ठेवता येईल का, याची चाचपणी करीत आहे.

१२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर मंदिरात दिवसभरात जास्तीत जास्त १७ ते १८ हजार भाविकांना दर्शन घेता येते. दर्शन पथ प्रकल्पातून ही क्षमता दुप्पट करण्याचे नियोजन आहे. तेवढी क्षमता वाढली तरी मुख्य पर्वणीवेळी दाखल होणाऱ्या लाखो भाविकांना मंदिरात दर्शन घेणे अशक्य आहे. त्यामुळे त्या दिवशी दर्शनासाठी मंदिर बंद ठेवण्यासारखा निर्णय घेणे क्रमप्राप्त ठरू शकते, असे संकेत देण्यात आले. प्रयागराज कुंभमेळ्यात तेथील प्रमुख मंदिरे बंद ठेवण्यात आल्याचा दाखला दिला जात आहे.

कुंभमेळ्यात त्र्यंबकेश्वर येथे प्रथम आणि द्वितीय अमृतपर्वणी अनुक्रमे २ ऑगस्ट आणि ३१ ऑगस्ट, तर तृतीय पर्वणी १२ सप्टेंबर २०२७ रोजी आहे. यावेळी १० शैवपंथीय आखाड्यांची गावातून मोठी मिरवणूक निघते. सर्व आखाड्यांचे साधू-महंत कुशावर्तात स्नान केल्यानंतर त्र्यंबकराजाच्या दर्शनासाठी जातात.

मुख्य पर्वणीचे तीन दिवस मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्याविषयी प्राधिकरणाने अद्याप देवस्थान व आखाड्यांशी चर्चा केलेली नाही.

'परंपरेला छेद देण्याचा प्रश्नच नाही'

देशातील चार कुंभमेळ्यांपैकी एकमेव त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्यात अमृतस्नानानंतर साधू-महंत त्र्यंबकराजाच्या दर्शनासाठी जाण्याची परंपरा आहे. यासाठी प्रत्येक शैवपंथीय आखाड्याची मंदिरात दर्शनासाठी वेळ राखीव असते. या परंपरेला छेद देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. पर्वणीच्या दिवशी दर्शनाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे मंदिर बंद ठेवण्याची बाब कदापि मान्य केली जाणार नाही. भाविकांसाठी दर्शन बंद करण्याच्या मुद्यावर सर्व आखाडे एकत्रितपणे चर्चा करतील.

– महंत शंकरानंद सरस्वती (अखिल भारतीय आखाडा परिषद, त्र्यंबकेश्वर)

'चर्चेनंतर निर्णय'

अमृतस्नानाच्या दिवशी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन प्रयागराजप्रमाणे त्र्यंबकेश्वर मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्याचा विचार आहे. परंतु, या संदर्भात देवस्थान, साधू-महंत आणि सर्व संबंधित घटकांशी चर्चा केली जाईल. मुख्यमंत्री, पालकमंत्री यांच्याशी विचारविनिमय करून या संदर्भात निर्णय घेतला जाईल.

– शेखर सिंह (आयुक्त, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण)

लग्नाचे प्रलोभन दाखवून अघोरी पूजा, भोंदूसह प्रियकराला अटक

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक – गुजरातमधील एका पीडित महिलेला तिच्या प्रियकराने नाशिकला आणल्यानंतर पंचवटीतील एका भोंदूने लग्न लावून देण्याचे आमिष दाखवत अघोरी पूजा करण्याच्या नावाखाली तिच्याकडून ७७ हजार रुपये उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. अघोरी पूजा करूनही लग्न जमत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) कार्यकर्त्यांच्या मदतीने भद्रकाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांनी जितू पवार आणि भोंदू विशाल खंडागळे यांना अटक केली आहे.

पीडित महिलेची नाशिक येथील तिच्या नात्यातील जितू पवार याच्याशी चार वर्षांपूर्वी ओळख झाली होती. पुढे त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. जितूने तिच्याशी लग्न करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, चार वर्षांनंतर त्याने लग्नास नकार दिला. याबाबत तिने जाब विचारला असता जितूने तिला मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. जितू हा नाशिकच्या फुलेनगर येथील विशाल खंडागळे याच्यासोबत भगतगिरी करत असल्याचे महिलेच्या लक्षात आले. तिने खंडागळे याच्याकडे जितूबाबत तक्रार केल्यानंतर त्याने महिलेला नाशिकला बोलावून घेतले. जितू तिच्याशी व्यवस्थित वागेल आणि त्यांचे लग्न जुळून येईल, असे आश्वासन त्याने दिल्याचा आरोप आहे.

त्यानंतर खंडागळे याने महिलेला भद्रकाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अमरधाम स्मशानभूमीत मध्यरात्री बोलावून घेतले. तेथे अघोरी पूजा करण्याचा बनाव करण्यात आला. प्रेत जाळण्याच्या ठिकाणी महिलेला बसवून जळालेल्या प्रेताची राख, लिंबू आणि लाह्या वापरून तिच्यावर मंत्र पुटपुटण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. काही लिंबू गोदावरी नदीत फेकण्यात आले, तर काही प्रेत ठेवण्याच्या लोखंडी जाळीवर ठेवण्यात आले.

या पूजेच्या नावाखाली खंडागळे याने महिलेकडून ऑनलाइन पद्धतीने मोठ्या रकमा घेतल्या. अशा प्रकारे त्याने एकूण ७७ हजार रुपये उकळल्याचा आरोप आहे. मात्र, पूजा करूनही लग्न जुळले नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पूजेपोटी दिलेले पैसे परत मागितले. त्यानंतर खंडागळे आणि त्याचा साथीदार जितू यांनी तिला दमदाटी व मारहाण करण्यास सुरुवात केल्याचा आरोप महिलेने केला आहे.

दरम्यान, महिलेने नाशिकमधील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधला. तिची आपबीती ऐकल्यानंतर कार्यकर्त्यांनी तिला सोबत घेऊन भद्रकाली पोलीस ठाणे गाठले. संबंधित भोंदू व त्याच्या साथीदाराची चौकशी करून पुराव्यांची पडताळणी करावी आणि जादूटोणाविरोधी कायद्यासह अन्य संबंधित कायद्यांनुसार कारवाई करावी, अशी मागणी अंनिसच्या वतीने करण्यात आली. पोलिसांनी प्रकरणाची चौकशी करून तक्रारीची पडताळणी केली. त्यानंतर जितू पवार आणि विशाल खंडागळे यांना अटक करून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ. टी. आर. गोराणे, राज्य सदस्य कृष्णा चांदगुडे आणि प्रल्हाद मिस्त्री यांनी या प्रकरणी सातत्याने पाठपुरावा केला.

नाशिकच्या महाविद्यालयांतील समस्या सोडवा

अमित ठाकरेंचा आंदोलनाचा इशारा

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक – दिल्ली येथे 'झेन जी'च्या आंदोलनानंतर युवा शक्तीची ताकद ओळखून राजकीय पक्ष आता विद्यार्थ्यांकडे मोर्चा वळवत आहेत. पुणे येथे शनिवारी काँग्रेस नेते राहुल गांधी विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना नाशिकमध्ये पक्ष संघटनेत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी मनसेचे अमित ठाकरे सक्रिय झाले आहेत. येथील नामांकित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात तसेच बाहेरील आवारात येणाऱ्या अडचणींचा पाढा त्यांच्यासमोर वाचला. या संदर्भात ठाकरे यांनी प्राचार्यांशी संवाद साधत हे प्रश्न महाविद्यालयीन स्तरावर न सुटल्यास 'मनसे स्टाईल'ने सोडवू, असा इशारा दिला आहे.अमित ठाकरे शनिवारी नाशिक दौऱ्यावर होते.

शहरातील केएसकेडब्ल्यू महाविद्यालय, आरवायके महाविद्यालय, केबीटी महाविद्यालय, केटीएचएम महाविद्यालय आणि क. का. वाघ महाविद्यालय येथे भेट देऊन त्यांनी विद्यार्थी सेनेच्या शाखेचे उद्घाटन केले. सदस्य नोंदणीचा आढावा घेतला. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाबाहेर रोडरोमिओंचा असलेला उच्छाद, महाविद्यालयाच्या आवारात येऊन सुरू असलेली त्यांची दादागिरी, आवारात धूम्रपान, अर्वाच्य शब्दांत शिवीगाळ, छेडछाड केली जाणे, महाविद्यालयातील स्वच्छतागृहांचा प्रश्न, सॅनिटरी नॅपकिन मशीन बंद असणे यांसह वेगवेगळ्या तक्रारींचा पाढा वाचला. यातील बहुतांश प्रश्न महाविद्यालयीन व्यवस्थापन आणि पोलीस विभागाशी संबंधित होते.

विद्यार्थ्यांच्या समस्या ऐकल्यानंतर ठाकरे यांनी प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी चर्चा केली. महाविद्यालयीन प्रशासनाला जे प्रश्न सोडवता येणे शक्य आहे, ते लवकरात लवकर सोडवावेत. विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या प्रश्नाबाबत पोलीस आयुक्तांशी चर्चा करण्यात येईल. मात्र, हे प्रश्न लवकरात लवकर न सुटल्यास 'मनसे स्टाईल'ने सोडवू, असा इशारा अमित ठाकरे यांनी दिला. यावेळी शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, राज्य सरचिटणीस गजानन काळे, मनविसेच्या ॲड. स्नेहल आडारकर, राज्य सचिव सोनाली पाटील यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

मालेगाव बायपास भूसंपादनात प्रत्यक्ष ताब्यानुसारच मोबदला

नाशिक – मालेगाव बाह्य वळण मार्ग अर्थात बायपास महामार्गासाठी जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांच्या भूसंपादनासंदर्भातील अडचणी सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक येथे घेण्यात आली. भूसंपादन प्रक्रियेत जमिनीच्या क्षेत्रफळाबाबत तफावत असल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेत, प्रत्यक्ष ताब्यात घेतल्या जाणाऱ्या क्षेत्राची सखोल पुनर्मोजणी करून त्यानुसारच भरपाईच्या नोटिसा बजावाव्यात, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणेला दिले. बैठकीस अप्पर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक सूरज गुंजाळ, उपविभागीय अधिकारी नितीन सदगीर, तहसीलदार विशाल सोनवणे तसेच राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यकारी अभियंता ज्योती शिंदे यांच्यासह संबंधित अधिकारी आणि बाधित शेतकरी उपस्थित होते. संयुक्त मोजणी व पोटहिस्सा मोजणीदरम्यान जमिनीच्या क्षेत्रफळात तफावत आढळून येत असल्याची बाब शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. यावर जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ मधील कलम ३ जी अंतर्गत अधिसूचित आखणी (अलाईनमेट) व क्षेत्रानुसार प्रत्यक्ष ताबा घेताना सखोल भू-मापन करण्याचे निर्देश दिले. निवाड्यातील क्षेत्र आणि प्रत्यक्ष ताब्यातील क्षेत्र यामध्ये तफावत असल्यास, प्रत्यक्ष ताबा घेताना दोन्हीपैकी जे क्षेत्र कमी असेल तेवढ्याच क्षेत्राचा ताबा घेण्यात यावा, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. उर्वरित क्षेत्राच्या दुरुस्तीसाठी कायद्यानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच, प्रत्यक्ष ताब्यात घेतल्या जाणाऱ्या क्षेत्रफळानुसारच शेतकऱ्यांना भरपाईच्या नोटिसा बजावण्यात याव्यात, असे निर्देश देण्यात आले. मूळ सर्व्हे नंबरचे यापूर्वीच विभाजन झाले असल्यास, त्या सर्व्हे नंबरमधील सर्व सहधारकांना नोटिसा न बजावता संबंधित विभाजित क्षेत्रातील सहधारकांनाच नोटिसा देण्यात याव्यात, असेही निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. दरम्यान, बैठकीस उपस्थित शेतकऱ्यांनी प्रशासनाने घेतलेल्या पारदर्शक भूमिकेचे स्वागत करून, भूसंपादनाची कार्यवाही नियमानुसार पूर्ण करण्यासाठी सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. --

विहीर, इमारत व झाडांचीही उपग्रह प्रतिमेद्वारे पडताळणी निवाड्यात नोंद नसलेली विहीर, इमारत किंवा झाडे प्रत्यक्ष जागेवर आढळून आल्यास त्यांचीही वस्तुनिष्ठ पद्धतीने पडताळणी करण्यात येणार आहे. यासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियमातील कलम ३ अ अंतर्गत अधिसूचनेच्या दिनांकाची महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (एमआरसीएसी) कडील सॅटेलाइट प्रतिमा वापरून संबंधित बाबींची अचूक पडताळणी केली जाईल. भूसंपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करताना पारदर्शकता व वस्तुनिष्ठता राखण्यावर प्रशासनाचा भर असल्याचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय महामार्गावरील मालेगाव बायपास महामार्गाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

नाशिक शहरातील प्रमुख रस्ते आणि चौकांमध्ये शनिवारी वाहतूक कोंडी झाली होती. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विविध कामांमुळे वाहतुकीवर आधीच परिणाम झाला आहे. खोदकामे आणि रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असताना, शनिवारी वाहतूक कोंडीचीही भर पडली. महात्मानगर, महात्मा गांधी रोड, गडकरी चौक, मुंबई नाका यासह शहरातील अनेक भागांत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. (छाया : यतीश भानू)

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी राज्यव्यापी लढ्याचा निर्धार

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक – अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देणे, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार 'ग्रॅच्युइटी', नियमित निवृत्ती वेतन योजना, आजारपणाच्या रजा व सामाजिक सुरक्षा देणे तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या इतर प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभर व्यापक लढा उभारण्याचा निर्धार महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्या मेळाव्यात करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघ या संघटनेचा अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेस सोबत संलग्नता समारंभ तसेच दिवंगत ज्येष्ठ कामगार नेते कॉम्रेड एम. ए. पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन मेळावा शनिवारी दादासाहेब गायकवाड सभागृहात पार पडला. मेळाव्याचे उद्घाटन महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य आ. सत्यजीत तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. आ. तांबे यांनी अंगणवाडी सेविका, मदतनीसांचे प्रश्न प्रदीर्घ काळापासून प्रश्न सुटले नसल्याचे नमूद केले. प्रत्येक अधिवेशनात आपल्या प्रश्नांची चर्चा होते. मोठे मोर्चे होतात. मात्र प्रश्न सोडवले जात नाही याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. अंगणवाडी, आशा, गट प्रवर्तक, अंशकालीन स्त्री परिचर, पोषण आहार योजना कर्मचारी यांचे प्रश्न आपण विधान परिषदेत मांडू, असे त्यांनी जाहीर केले.यावेळी दिवंगत कामगार नेते कॉम्रेड एम. ए. पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ब्रिजपालसिंग उपस्थित होते. सिंग यांनी अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मानधनावर काम करण्यास भाग पाडले जात असून त्यांना नियमित वेतन, निवृत्ती वेतन, सामाजिक सुरक्षा व पुरेशा रजा मिळत नसल्याचा मुद्दा उपस्थित केला.

वीज चोरीप्रकरणी १४ गुन्हे; महावितरणची कारवाई

नाशिक – महावितरणच्या नाशिक भरारी पथकाने वीजचोरीविरोधात मोहीम राबवत सिन्नर, येवला आणि वणी परिसरात धडक कारवाई केली. या कारवाईत वीज चोरून व्यावसायिक वापर करणाऱ्या १४ जणांवर मनमाड पोलीस ठाण्यात एकाच दिवशी गुन्हे दाखल करण्यात आले.भरारी पथकाने १९ जून रोजी सिन्नर तालुक्यातील निमगाव येथे सात ठिकाणी, सहा आणि सात जुलै रोजी येवला तालुक्यातील जळगाव नेऊर आणि चिचोंडी शिवारात १२ ठिकाणी, तसेच वणी शहरातील चार ठिकाणी वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आणली होती. या ठिकाणी केलेल्या कारवाईनंतर नऊ ग्राहकांनी महावितरणचे वीजचोरीचे नियमानुसार थकीत देयक भरले. उर्वरित १४ थकबाकीदारांविरुद्ध १९ ऑगस्ट रोजी मनमाड पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविण्यात आले. या संदर्भात नाशिक भरारी पथकाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता अनिलकुमार तिवारी यांनी तक्रार दाखल केली. ही मोहीम सुरक्षा व अंमलबजावणी विभागाच्या कार्यकारी संचालक अपर्णा गीते, उपसंचालक कोकण परिक्षेत्र सुमितकुमार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

पंजाब नैशनल बैंक
भारत सरकारचा उपक्रम
pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे"** व **"जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेद्वारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३०.०६.२०२६ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा: PNB- पिंपळगण (B)-119010 कर्जदार:जे के औद्योगिक सेवा नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता:** प्रा.सुधाकर गणपतराव कापडी, सर्वेक्षण क्रमांक 670-ए/2 पैकी एन.ए. औद्योगिक भूखंड क्रमांक 112 आणि 113 श्री समर्थ सहकारी औद्योगिक वसाहत लि., मुखेड रोड, गाव पिंपळगाव बसवंत, तालुका निफाड, जिल्हा नाशिक, महाराष्ट्र-422209 **2. श्री सुधाकर गणपतराव कापडी (प्रोप्रायटर)** पत्ता:दुकान क्रमांक 16, औद्योगिक वसाहत, पिंपळगाव एमआयडीसी मुखेड रोड, पिंपळगाव (बु), ता. निफाड, जिल्हा- नाशिक-422209 **3. श्री सुधाकर गणपतराव कापडी (प्रोप्रायटर)** घराचा पत्ता: मल्हार संभाजी कॉलनी, शिवाजी नगर, पिंपळगाव (बु), ता- निफाड, जिल्हा- नाशिक- 422209.	सर्व्हे क्रमांक ६७०-ए/२ मधील, २५० चौ.मी. क्षेत्रफळाचा अकृषिक (N.A.) औद्योगिक भूखंड क्रमांक ११२ आणि २५० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड क्रमांक ११३ (एकुण क्षेत्रफळ '५०० चौ.मी.), तसेच त्यावर असलेले अंदाजे २२८ चौ.मी. क्षेत्रफळाचे औद्योगिक शेड; 'श्री समर्थ सहकारी औद्योगिक वसाहत लि.', मुखेड रोड, गाव पिंपळगाव बसवंत, तालुका निफाड, जिल्हा नाशिक **सीमा: उत्तर:** भूखंड क्रमांक ८८, ८९ आणि ९० **दक्षिण:** १५ मीटर रुंद रस्ता **पूर्व:** भूखंड क्रमांक ११४ **पश्चिम:** भूखंड क्रमांक १११मालमत्ता क्रमांक **प्रॉपर्टी आयडी:** PUNB008288W2354839279	अ) ०९-०३-२०२६ ब) रु. १,४४,०६,४४५/- + इतर व्याज + खर्च क) २१-०५-२०२६ ड) सांकेतिक ताबा	अ) रु. ६०.६३ लाख ब) रु. ६.०६३ लाख (२४.०९.२०२६) क) रु. ०.५० लाख	दि. २४.०९.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, **24.09.2026** @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर **https://baanknet.com** वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताद्वारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया **www.pnb.bank.in.** आणि **https://baanknet.com** ही वेबसाईट पाहावी

दिनांक - २३.०८.२०२६
स्थळ - नाशिक

स्वाक्षरी/-
श्री. सजील कुमार
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)

टीप : स्वैर भाषांतर: तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य